# महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
# नाशिक विभागीय मंडळ, नाशिक—४२२ ००१.

परिपत्रक क्र./नाविमं/लेखा/ नोदंणी शुल्क/शिक्षण संक्रमण शुल्क २०२०—२०२१/७५७ दिनांक :- २१/०७/२०२०

**विषय:— नोंदणी शुल्क व शिक्षण संक्रमण शुल्क भरणेबाबत....**

नाशिक विभागीय मंडळाच्या कार्यकक्षेतील सर्व मंडळ मान्यता प्राप्त शाळा/क. महाविद्यालय प्रमुखांना या परिपत्रकान्वये कळविण्यात येते की, सन २०२०—२०२१ या शैक्षणिक वर्षाचे नोंदणी शुल्क शाळा/क. महाविद्यालय प्रमुखांनी खाली नमुद केलेल्या दराने इ.१०वी /इ.१२वी च्या नियमित विद्यार्थी संख्येप्रमाणे **तसेच शिक्षण संक्रमण शुल्क प्रत्येकी रु ५००/- प्रमाणे दिनांक १० ऑगस्ट २०२०पुर्वी विभागीय मंडळाकडे बॅक ऑफ इंडिया मध्ये दोन स्वतंत्र चलनाद्वारे जमा करण्यात यावे.**

| तपशिल | नोंदणी शुल्क | |
|---|---|---|
| | इ. १०वी | इ. १२वी |
| १ ते १०० विद्यार्थ्यांकरीता | रु.१०००/— | रु.१०००/— |
| त्यापुढील प्रत्येक १००विद्यार्थ्यासाठी | रु.२००/— | रु.४००/— |

उपरोक्त दराप्रमाणे नोंदणी शुल्क दिनांक १० ऑगस्ट २०२० पूर्वी विभागीय मंडळाकडे जमा न केल्यास निर्धारित नोंदणी शुल्काव्यतिरिक्त खालील प्रमाणे दंडात्मक जादा रक्कम भरावी लागेल, याची नोंद घ्यावी.

| अ. क्र. | तपशिल | दंडाची रक्कम | |
|---|---|---|---|
| | | इ.१०वी | इ.१२वी |
| १ | ११ ऑगस्ट ते ३१ ऑगस्ट २०२० | रु.२००/- | रु.२००/- |
| २ | १ सप्टेंबर ते ३० सप्टेंबर २०२० | रु.३००/- | रु.३००/- |
| ३ | १ ऑक्टोबर२०२० नंतर नियमित विद्यार्थ्यांची आवेदनपत्र सादर करण्याच्या तारखेपर्यंत | रु.५००/- | रु.५००/- |

विशेष सूचना

१. राज्य मंडळाचे पत्र क्र. रा.मं/प्र./शि.सं./.३२२२,पुणे –दि-१५/०७/२०२० अन्वये शैक्षणिक वर्ष 2020-21 पासून शिक्षण संक्रमण अंकाच्या वर्गणीचे शुल्क पुढील प्रमाणे आकारण्यात येत आहे.
अ) किरकोळ अंकाचे शुल्क रु 20/-ऐवजी रु 25/- करण्यात आलेले आहे. ब) अंकाचे वार्षिक शुल्क रु 200/-ऐवजी 250/- करण्यात आलेले आहे .
**क) मंडळाचे मान्यता प्राप्त माध्यमिक शाळा/ क. महाविद्यालय यांना प्रत्येक महिन्याचे किमान 2 अंकाचे वार्षिक वर्गणीदार होणे बंधनकारक करण्यात आलेले आहे. शिक्षण संक्रमणच्या दोन अंकाचे वार्षिक वर्गणीचे रु 500/-इतके शुल्क भरणे अनिवार्य करण्यात आले आहे.**

२. नोंदणी शुल्क व शिक्षण संक्रमण शुल्क मंडळाकडे बॅक ऑफ इंडियाच्या चलनाद्वारेच स्वतंत्ररित्या जमा करण्यात यावे.

३. चलनातील सर्व माहिती परिपुर्ण भरून चलनावर विद्यार्थी संख्येची नोंद करणे आवश्यक आहे.

४. दि.१० ऑगस्ट २०२० नंतर नोंदणी शुल्क भरल्यास नोंदणी शुल्क दंडाची रक्कम वर नमुद केल्याप्रमाणे दोन्ही एकत्रित शुल्क भरणे आवश्यक राहील.

५. नोंदणी शुल्क व शिक्षणसंक्रमण शुल्क मंडळाकडे पाठवितांना सोबत पाठविलेल्या नमुन्यातील पत्रावर शाळा/कनिष्ठ महाविद्यालयाचा सांकेतिक क्रमांक इ.१०वी/इ.१२वी नियमित विद्यार्थी संख्या,चलनक्रमांक,दिनांक,एकुण रक्कम,बॅकेचे नाव इ. बाबी नमुद केलेल्या असाव्यात.

६. ज्या शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांचे वर्ग संलग्न असतील अशा शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांनी इ.१०वी/इ.१२वी साठी स्वतंत्र रु.५००/—शिक्षण संक्रमण शुल्क भरणे आवश्यक आहे. **(वर्गणीचा कालावधी माहे जुलै २०२० ते जून २०२१ धरावा.)**

७. इ.१०वी/इ.१२वी साठी फेब्रुवारी/मार्च—२०२१ च्या परीक्षेकरीता प्राप्त होणारे नोंदणी शुल्क हे आपण दर्शविलेली विद्यार्थी संख्या व मंडळाकडे प्राप्त नियमित विद्यार्थ्यांची आवेदनपत्राची संख्या यांची पडताळणी करण्यात येणार आहे, तेव्हा नोंदणी शुल्क भरतांना सदर बाबींची मुख्याध्यापक/प्राचार्यांनी दक्षता घ्यावी.

८. अपरिहार्य कारणास्तव चलनाद्वारे शुल्क जमा करता न आल्यास मंडळ कार्यालयात रोखीने अथवा राष्ट्रीयकृत बॅकेचा डिमांड ड्राफ्ट काढण्यात यावा. डिमांड ड्राफ्टच्या मागील बाजूस शाळा/कनिष्ठ महाविद्यालयाचा सांकेतिक क्रमांक, नोंदणी शुल्क अथवा शिक्षण संक्रमण शुल्क सन २०२०—२०२१ अशी माहिती नमुद करणे आवश्यक आहे.

९. विभागीय सचिव, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, नाशिक विभागीय मंडळ, नाशिक—४२२ ००३.या नावाने डिमांड ड्राफ्ट काढण्यात यावा.

१०. या व्यतिरिक्त ज्या शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांना जादा अंक पाहिजे असल्यास तसेच वैयक्तिक वर्गणीदार व इतर संस्था यांनी आपली वर्गणी सचिव, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, स.न.८३२—ए फायनल प्लॉट नं.१७८ व १७९, बालचित्रवाणीजवळ, आघारकर रिसर्च इन्स्टिट्युटमागे, भाबुंर्डा, शिवाजीनगर पुणे ४११ ००४ या नावे मनीऑर्डर अथवा डिमांडड्राफ्ट द्वारे पाठवावी. मनीऑर्डर फॉर्मवरील मजकुरासाठी जागा **(Sender Message)** या रकान्यामध्ये (आपणास टपालाने अंक पाठविण्यासाठी) आपले संपूर्ण नांव आणि जवळच्या खुणेसह तसेच पिनकोडसह संपूर्ण पत्ता, सुवाच्य अक्षरात अचूकपणे नमूद करावा.

वरील सर्व सूचनांची नोंद घेवून नोंदणी शुल्क व शिक्षण संक्रमण शुल्क मंडळाकडे मागील वर्षाप्रमाणे पोष्टाने पाठवावे मात्र चलन/डी.डी. दि.१० ऑगस्ट २०२० पुर्वी काढलेला असावा. सदर दिनांकानंतर काढण्यात येणारे चलन/डी.डी. दंडात्मक रक्कमेसह त्वरीत मंडळ कार्यालयाकडे पाठविण्यात यावेत. अन्यथा या संदर्भात कोणतेही स्मरणपत्र न पाठविता मंडळ मान्यता व सांकेतिक क्रमांक रद्द करण्याबाबत कार्यवाही करण्यात येईल, याची गांभीर्याने नोंद घ्यावी.

(नितिन उपासनी)
विभागीय सचिव
महाराष्ट्र राज्य माध्य.व उच्च माध्य.शिक्षण मंडळ,
नाशिक विभागीय मंडळ, नाशिक—४२२ ००३.

प्रति,
सर्व मान्यता प्राप्त शाळा/कनिष्ठ महाविद्यालयातील मुख्याध्यापक/प्राचार्य,
नाशिक, धुळे,जळगाव, नंदुरबार, जिल्हे.

# नोंदणी शुल्क व शिक्षण संक्रमण शुल्क पाठविण्याचा नमुना

**नोंदणी शुल्क व शिक्षण संक्रमण शुल्काची माहिती मंडळास सादर करतांना चलनासोबत**
**इ.१०वी /इ.१२वी करीता स्वतंत्र प्रपत्र वापरावे.**

| शाळा सांकेतांक | S | | | | | | | दुरध्वनी / भ्रमणध्वनी | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| क. म.सांकेतांक | J | | | | | | | | | | | | | | | | | |

जा.क्र./--------------
दिनांक :- ------------

प्रति,
मा.विभागीय सचिव,
महाराष्ट्र राज्य माध्यमिक व
उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
नाशिक विभागीय मंडळ,
नाशिक-४२२ ००३.

विषय :- **नोंदणी शुल्क व शिक्षण संक्रमण शुल्क भरणेबाबत....**
संदर्भ :- आपले परिपत्रक क्र.नाविमं/लेखा/नों.शु./२०२०-२१/ दिनांक- /०७/२०२०

महोदय,
उपरोक्त संदर्भिय विषयास अनुसरून इ.१०वी /इ.१२वी सन २०२०–२०२१या शैक्षणिक वर्षाचे शाळा/कनिष्ठ महाविद्यालयाचे मंडळ मान्यता शुल्क व शिक्षण संक्रमण अंकाच्या शुल्काचे चलन/डि.डि.या सोबत पाठविण्यात येत असून त्याचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

**नोंदणी शुल्क (इ.१०वी/इ.१२वी)**

| शाळा सांकेतांक | S | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| कनिष्ठ महाविद्यालय सांकेतांक | J | | | | | | | |

**सन २०२०–२०२१ करीता नोंदणी शुल्काचा तपशिल**

| नियमित विद्यार्थी संख्या | बँकेचे नांव | चलन क्रमांक/डि.डि./ रोख पावती क्रमांक | दिनांक | रुपये |
|---|---|---|---|---|
| | | | | |

---

**शिक्षण संक्रमण अंक शुल्क (इ.१०वी/इ.१२वी)**

| शाळा सांकेतांक | S | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| कनिष्ठ महाविद्यालय सांकेतांक | J | | | | | | | |

**सन २०२०–२०२१ करीता शिक्षण संक्रमण अंक शुल्काचा तपशिल**

| नियमित विद्यार्थी संख्या | बँकेचे नांव | चलन क्रमांक/डि.डि./ रोख पावती क्रमांक | दिनांक | रुपये |
|---|---|---|---|---|
| शाळा सांकेतांक | | | | 500/- |
| कनिष्ठ महाविद्यालय सांकेतांक | | | | 500/- |

स्वाक्षरी
मुख्याध्यापक/प्राचार्य
शाळा/कनिष्ठ महाविद्यालयाचा शिक्का

टिपः-
१. इ.१०वी /इ.१२वी करीता शिक्षण संक्रमण अंकाचे बँक ऑफ इंडियाचे चलन/डि.डि.स्वतंत्र पाठवावे.
२. इ.१०वी /इ.१२वी स्वतंत्र प्रपत्र पाठविणे आवश्यक आहे.
३. इ.१०वी /इ.१२वी नोंदणी शुल्काचे चलन/डि.डि.स्वतंत्र पाठवावेत.
४. **वरील सर्व माहिती ही राज्यमंडळ पुणे येथे पाठवावयाची असल्याने प्रत्येक शाळा व कनिष्ठ महाविद्यालय यांनी आपला संपूर्ण पत्ता पिनकोडसह दूरध्वनि व भ्रमणध्वनि क्रमांक इत्यादि माहिती अचूक कळविणे बंधनकारक आहे.**